**<u>ठळक बातम्या</u>**

- ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन /मराठी भाषेनं समाजातल्या शोषित, वंचित वर्गासाठी सामाजिक मुक्तीचं द्वार उघडल्याचे प्रधानमंत्र्यांचे गौरवोद्गार
- भाषा ही जोडणारी हवी, तोडणारी नाही, अशी संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांची स्पष्टोक्ती
- बंगाल उपसागराच्या आंतर सरकार संघटनेचं अध्यक्षपद बांगलादेशाकडून भारतानं स्वीकारलं
- छत्रपती संभाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह मजकूर न हटवल्याबद्दल विकिपीडियाच्या चार संपादकांविरुद्ध सायबर विभागाकडून गुन्हा दाखल

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळनं पटकावलं अंतिम सामन्यात स्थान

**<><><><><>**

मराठी भाषेनं समाजातल्या शोषित, वंचित वर्गासाठी सामाजिक मुक्तीचं द्वार उघडलं असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत केलं. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ज्ञानोबा तुकारामांच्या मराठीला राजधानी दिल्ली मनापासून अभिवादन करत असल्याचे ते यावेळी म्हणाले...

यावेळी त्यांनी अनेक मराठी साहित्यिक, समाज सुधारक, मराठी साहित्य यांचा उल्लेख केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देता आला हे सौभाग्य असल्याचं ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळं मराठी भाषा आणि परंपरेशी संबंध आला. त्यामुळं मराठी बोलण्याचा प्रयत्न, मराठीचे नवीन शब्द शिकण्याचा प्रयत्न आपण नेहमीचं केला असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

भाषा ही संस्कृतीची संवाहक आहे. ती समाज निर्माणात महत्त्वाची भूमिका बजावते, असं ते म्हणाले. १०० व्या साहित्य संमेलनच्या तयारीला आतापासूनचं लागावं अस आवाहन त्यांनी केलं. त्यात अधिकाधिक युवकांना सामावून घ्या, अधिकाधिक लोकांना मराठी शिकवण्यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना त्यांनी केल्या.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलं संमेलन दिल्लीत होतंय ही अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. मराठी लोकभाषा झाल्यानं ती समृद्ध झाल्याचं त्यांनी सांगितलं. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले. संमेलनाला महिला अध्यक्ष मिळाल्याबद्दल पवार यांनी तारा भवाळकर आणि साहित्य महामंडळाचं अभिनंदन केलं. राजकारण्यांनी साहित्य संमेलनाच्या मंचावर येऊ नये, यावरुन दरवर्षी वाद होतो, असं सांगत त्यांनी विधीमंडळात आलेल्या विविध साहित्यिकांची उदाहरणं दिली, आणि या विषयावरुन वाद नको, असं आवाहन केलं.

संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांनी छोटेखानी भाषणात, भाषा ही जोडणारी हवी, तोडणारी नाही, असं मत व्यक्त केलं.

भाषा ही जैविक गोष्ट आहे, ती बोलली तर जिवंत राहते, असं त्या म्हणाल्या. साहित्य संमेलनाची अध्यक्ष महिला झाली हा मुद्दा नसून गुणवत्ता हा मुद्दा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे यांनी प्रास्ताविक केलं आणि आयोजक संजय नहार यांनी या संमेलनामागची भूमिका मांडली. काश्मिरमधली गायिका शमिमा अख्तर हिनं राज्य गीत आणि पसायदान म्हटलं.

दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

<><><><><>

भारतानं आज बंगाल उपसागराच्या आंतर सरकारी संघटनेचं अध्यक्षपद बांगलादेशाकडून स्वीकारलं. मालदीवमध्ये माले इथं झालेल्या १३व्या प्रशासकीय मंडळ बैठकीत मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. अभिलाक्ष लिखी यांच्या नेतृत्वाखालच्या भारतीय शिष्टमंडळानं  ही अध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारली. प्रादेशिक सहकार्याचं  महत्त्व आणि विकसनशील राष्ट्रांच्या हितासाठी इतर देशांसह भारताची महत्त्वाची भूमिका त्यांनी यावेळी अधोरेखित केली.

<><><><><>

लघुकालीन नफ्याच्या मागे धावताना नागरिकांनी दीर्घकालीन वित्तीय सुरक्षेकडे दुर्लक्ष करु नये, असा सल्ला रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर एम. नागेश्वर राव यांनी दिला आहे. मुंबईत राष्ट्रीय शेअर बाजारात आयोजित

आर्थिक परिषदेत ते बोलत होते. नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरतेचा अभाव असल्यानं या गोष्टी होतात. आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी रिझर्व्ह बँक इतर वित्तीय नियामकांसोबत काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

छत्रपती संभाजी महाराजांविषयीचा आक्षेपार्ह मजकूर न काढल्याबद्दल महाराष्ट्र सायबर विभागानं विकिपीडियाच्या चार संपादकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाचं संपादन करणाऱ्या, कॅलिफोर्निया इथल्या विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून मजकूर काढून टाकण्याची विनंती सायबर विभागानं केली होती. मात्र नोटीस पाठवूनही हा मजकूर हटवलेला नाही. अशा प्रकारचा मजकूर माहितीच्या स्रोतावर झळकत राहिला, तर राज्यात तणावाचं वातावरण निर्माण होऊ शकतं, त्यामुळे गुन्हा दाखल केल्याची माहिती सायबर विभागानं दिली आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळनं अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. नागपुरात झालेल्या उपांत्य सामन्यात विदर्भानं मुंबईवर ८० धावांनी विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. विजयासाठी विदर्भानं दिलेल्या ४०६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईचा, दुसरा डाव ३२५ धावांवर संपला. या डावात, विदर्भातर्फे हर्ष दुबेनं ५ गडी बाद केले. पहिल्या डावात ५४ आणि दुसऱ्या डावात १५१ धावा करणारा विदर्भाचा यश राठोड सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात झालेल्या उपांत्य सामन्यात आज गुजरातचा पहिला डाव ४५५ धावांवर संपला. त्यामुळे या डावात

केरळला २ धावांची नाममात्र पण महत्वाची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात केरळनं दिवसअखेर ४ बाद ११४ धावा केल्या. आज सामन्याचा शेवटचा दिवस असल्यानं सामना अनिर्णित राहिला. मात्र पहिल्या डावातल्या आघाडीच्या जोरावर केरळनं अंतिम सामन्यात स्थान निश्चित केलं. पहिल्या डावात नाबाद १७७ धावा करणारा केरळचा महंमद अजहरुद्दीन सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

विजेतेपदासाठीची अंतिम लढत येत्या २६ तारखेला सुरू होईल.

<><><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा उद्या पुणे दौऱ्यावर येत आहेत. गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेच्या 27व्या बैठकीचं अध्यक्षस्थान ते भूषवणार आहेत.

या दौऱ्यात अमित शहा जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभालाही उपस्थित राहणार आहेत. तसंच प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातल्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्रांचं वितरण करणार आहेत. त्या व्यतिरिक्त राज्यातल्या 10 लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचं वितरणही शहा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषेदत याबाबत माहिती दिली.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठाच्या ६५ व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधलेल्या, विद्यापीठाच्या चार इमारतींचं आभासी पद्धतीनं भूमिपूजन, आणि संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त सरस्वती भुवन शैक्षणिक संस्थेत आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत.

**<><><><><>**

महिला प्रिमीअर लिग क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई इथं रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि मुंबई इंडियन्स यांचा सामना सुरु आहे.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूच्या ९ षटकात ४ बाद ६२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत आज कराची इथं सुरु असलेल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं अफगाणिस्तानसमोर ३१६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. त्यात रायन रिक्ल्टनच्या शतकी खेळीचा मोठा वाटा आहे.

या आव्हानाचा पाठलाग करताना, शेवटची बातमी हाती आली तेव्हा, अफगाणीस्तानच्या १९ षटकात ४ बाद ७० धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**